# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा.३५)च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर २०११ रोजी स्थापीत व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालत त राज्य विद्यापीठ)

## (क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग)

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली – ४४२६०५

जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ ६४३ /२०२५ दिनांक : ०४/०१/२०२५

प्रति,

- ✓ मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
- ✓ मा. सर्व विभाग प्रमुख, प्रशासकीय / शैक्षणिक विभाग, गों. वि. गडचिरोली
- ✓ सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी, सर्व संलग्नीत महाविद्यालये व गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**विषय :- अमृत क्रीडा व कला महोत्सव -२०२५, क्रीकेट स्पर्धेच्या आयोजनाबाबत.. (सुधारीत फेरिपत्रक)**

संदर्भ :- १) या कार्यालयाचे सुचना पत्र क्र. ६१०/२०२४, दिनांक २३/१२/२०२४
२) क्रीकेट स्पर्धेच्या आयोजनाबाबत फेरिपत्रक सुचना क्री.शा.शि./६२२/२०२५, दि. ०२/०१/२०२५

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येत आहे की, दरवर्षीप्रमाणे **अमृत क्रीडा व कला महोत्सवाचे** गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली येथे दि. १० ते १२ जानेवारी, २०२५ दरम्यान आयोजन करण्यात येत आहे. सदर महोत्सवातील क्रीकेट स्पर्धेकरीता विविध महाविद्यालयांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या संघांनी विद्यापीठाकडे नोंदणी केलेली आहे. क्रीकेट खेळासह इतरही क्रीडा प्रकारात कर्मचारी यांना सहभाग घेता यावा तसेच इतरही क्रीडांचे सुव्यवस्थीत नियोजन करता यावे यादृष्टिने क्रीकेटचे सामने खालीलप्रमाणे दिनांक व स्थळी खेळविण्यात येत आहेत. सुधारीत फेरिपत्रक पुढीलप्रमाणे आहे. याची सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.

**स्पर्धेचा कालावधी : दि. ०६ ते ०९ जानेवारी, २०२५**
**स्पर्धेचे स्थळ : राष्ट्रिय शारीरिक शिक्षण महाविद्यालय विसापूर, जि. चंद्रपूर**
**स्पर्धा प्रमुख : डॉ. महेशचंद शर्मा, भ्रमणध्वनी क्रमांक 9673950001**

**क्रिकेट स्पर्धा सुधारीत फेरिपत्रक पुढीलप्रमाणे -**

1) गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
2) नेवजाबाई हितकारणी महा. ब्रम्हपुरी
3) महात्मा गांधी महाविद्यालय, गडचांदूर
4) एस.आर.एम. समाजकार्य महा. पडोली
5) शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली
6) जनता महाविद्यालय चंद्रपूर
7) आनंद निकेतन महाविद्यालय वरोरा
8) मो. जव्हेरी महाविद्यालय वडसा
9) रा. म. गांधी महाविद्यालय, नागभीड
10) गुरूनानक महाविद्यालय, बल्लारपुर
11) चिंतामणी महाविद्यालय, पोंभुर्णा



| सामन्यांचा दिनांक व रिपोर्टींगचा वेळ | मॅच/सामने क्रमांक |
|---|---|
| **दिनांक : ०६/०१/२०२५**<br>**रिपोर्टींग वेळ : सकाळी ८.०० वाजता** | **१, २ व ३** |
| **दिनांक : ०७/०१/२०२५**<br>**रिपोर्टींग वेळ : सकाळी ८.०० वाजता** | **४, ५, ६ व ७** |
| **दिनांक : ०८/०१/२०२५**<br>**रिपोर्टींग वेळ : सकाळी ८.०० वाजता** | **८, ९, १०** |

**सुचना :-**

१. क्रिकेट खेळाचे संपुर्ण सामने हे वरील ठिकाणीच खेळवले जातील.
२. स्पर्धेचा कालावधी वरीलप्रमाणे असून दिनांक निहाय सामन्यांचे नियोजन करण्याची जबाबदारी व आवश्यकतेनुसार फेरबदल करण्याचे अधिकार स्पर्धा प्रमुखांना असेल. त्यामुळे संघानी आपआपल्या स्पर्धेचा दिनांक स्पर्धा प्रमुखांशी संपर्क साधून निश्चित करावा व त्यानुसार स्पर्धा स्थळी वेळेत उपस्थित रहावे.
३. क्रिकेट सामना हेवी टेनिस बॉल ने खेळविल्या जाईल.
४. प्रत्येक संघातील नियमीत शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी स्वखर्चाने नियोजीत ठिकाणी खेळण्याकरीता वेळेत उपस्थित राहावे, अनुपस्थित राहील्यास संघ बाद ठरविण्यात येईल.
५. प्रत्येक क्रिकेट संघाने बॅट व इतर आवश्यक साहीत्य स्वत: घेऊन यावे.
६. प्रत्येक संघातील कर्मचारी यांनी खेळाच्या ठिकाणी महाविद्यालयाचे/विद्यापीठाचे मुळ ओळखपत्र व आधार कार्ड सोबत घेऊन यावे, नियमानुसार नियमीत शिक्षकेत्तर कर्मचारी यांनाच संघात स्थान राहील, नियमांचे उल्लंखन केल्यास संघास बाद ठरविण्यात येईल.
७. स्पर्धा प्रमुखांनी विद्यापीठाकडे नोंदणी केलेल्याच कर्मचाऱ्यांची ओळख पटवून त्यांना संघात स्थान द्यावे.
८. पंचाचा निर्णय अंतिम राहील.
९. प्रत्येक कर्मचारी यांनी खेळतांना खेळ भावनेतुन खेळावे.
१०. नशा/धुम्रपान करण्यास सक्त मनाई असेल, तसेच प्रशासकीय कार्यवाहीस प्राप्त असेल.
११. खेळतांना इजा होणार नाही याची दक्षता घ्यावी, इजा झाल्यास खेळाडू स्वत: जबाबदार राहील.
१२. विद्यापीठामार्फत नियुक्त परिक्षकांच्या देखरेखी खाली सामने खेळविले जातील. परिक्षक / स्पर्धा प्रमुखांनी त्याचा अहवाल वेळोवेळी क्रिडा व शारिरीक शिक्षण विभाग, गों. वि. गडचिरोली यांचे कडे सादर करावे.

**डॉ. अनिता लोखंडे**
संचालक (प्र.), क्रीडा व शा. शिक्षण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

प्रतिलिपी माहितीस्तव -

१) मा. कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
४) मा. प्राचार्य, गुरूनानक विज्ञान महाविद्यालय, बल्लारपूर, जि. चंद्रपूर
५) मा. प्राचार्य, राष्ट्रिय शा. शिक्षण महाविद्यालय, विसापूर, जि. चंद्रपूर
६) डॉ. महेशचंद शर्मा, क्रीकेट स्पर्धा प्रमुख, अमृत क्रीडा व कला महोत्सव 2025